# कल्याण वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


महाराष्ट्र पोलीस

**पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर**
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/9६० /२०२४ दि. 05 /०९/२०२४

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी, कल्याण** वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. ०७/०९/२०२४ ते दि. १७/०९/२०२४ या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. तसेच दि. १६/०९/२०२४ रोजी **'ईद–ए–मिलाद'** सणानिमित्त मोठी मिरवणूक काढण्यात येणार आहे. सदर कालावधीत नमूद विसर्जन मार्गावर व मिरवणूक मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**मुख्य मिरवणूक मार्ग** :– मुरबाड रोड, महात्मा फुले चौक, महमंद अली चौक, शिवाजी चौक, शंकरराव चौक, घेला देवजी चौक, दूधनाका, पारनाका, टिळक चौक, अहिल्याबाई चौक, गणपती चौक, तेलवणे हॉस्पिटल क्रॉस, मोहिंदरसिंग काबुलसिंग क्रॉस, लाल चौक, दुर्गामाता चौक ते दुर्गाडी गणेश घाट याप्रमाणे आहे.

कल्याण शहरातील गणेश मूर्ती विसर्जनाच्या मुख्य मार्गास येवून मिळणाऱ्या खालील नमूद जोड रस्त्यावर मिरवणूक मार्गापासून १०० मीटर पर्यंत कोणतेही प्रकारची वाहने उभी करण्यास मनाई **'No Parking Zone'** करण्यात येत आहे.

१) मुरबाड रोड पौर्णिमा टॉकिज कडून इंदिरानगर कडे जाणाऱ्या रोडवर
२) सिंधीगेट मस्जिद गल्ली ते संताषी माता मंदिराकडे जाणाऱ्या रोडवर
३) सिंधीगेट ते कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त बंगल्याकडे जाणाऱ्या रोडवर
४) कर्णिक रोड ते संतोषी माता मंदिराकडे जाणाऱ्या रोडवर
५) रामबाग लेन नं. ६
६) जुने ए.पी.जी. कार्यालयाकडून संतोषी माता मंदिराकडे जाणाऱ्या रोडवर
७) डॉ. म्हसकर हॉस्पिटल कडून रामबाग लेन नं. ४ कडे जाणाऱ्या रोडवर
८) परळीकर वखारी समोरील रोडवर
९) छाया टॉकिज ते रामबाग लेन नं. ४ कडे जाणाऱ्या रोडवर
१०) महंमद अली चौक ते जोशी बाग कडे जाणाऱ्या रोडवर
११) महंमद अली चौक ते दिपक हॉटेलकडे जाणाऱ्या रोडवर
१२) घेला देवजी मंदिराकडून अहिल्याबाई चौकाकडे जाणाऱ्या रोडवर
१३) मराठी ज्ञाती हॉलकडून सुभाष मैदानाकडे जाणाऱ्या रोडवर
१४) चंद्रविलास हॉटेल कडून अन्सारी चौकाकडे जाणाऱ्या रोडवर
१५) चंद्रविलास हॉटेल ते कासारहाट गल्लीकडून टिळक चौकाकडे जाणाऱ्या रोडवर
१६) गांधी चौकाकडून टिळक चौकाकडे जाणारी गल्ली
१७) गांधी चौक ते सुभेदार वाडयाकडे जाणारी गल्ली
१८) गगनशेठ पेढी ते पारनाका कडे जाणाऱ्या रोडवर
१९) बारदान गल्ली ते शाळा क्र. ६ कडे जाणारी गल्ली
२०) मर्कन्टाईल बॅक ते गुप्ते चौकाकडे जाणाऱ्या रोडवर
२१) दूधनाका ते इकबाल चौकाकडे जाणाऱ्या रोडवर
२२) विजय लॉड्री ते राम मंदिर (मारूती) कडे जाणाऱ्या रोडवर
२३) पारनाका ते लाल चौकाकडे जाणाऱ्या रोडवर
२४) लक्ष्मी नारायण मंदिर ते दत्तात्रय मंदिराकडे जाणाऱ्या रोडवर
२५) टिळक चौक, भारताचार्य वैद्य चौकाकडे जाणाऱ्या रोडवर

CS CamScanner

२६) टिळक चौक ते गणपती चौकाकडे जाणाऱ्या रोडवर
२७) अभिनव मंदिर गल्ली
२८) भा.ज.पा. कार्यालयाकडे जाणारी गल्ली
२९) गणपती चौक ते वीर कोतलावाल चौकाकडे जाणाऱ्या रोडवर
३०) गणेश आईस्क्रीम समोरील जय मल्हार कडे जाणाऱ्या रोडवर
३१) सहजानंद चौक कडून काळी मस्जिद कडे जाणाऱ्या रोडवर
३२) मिलिंद नगर ते गौरीपाडा तलाव दोन्ही बाजूस

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. ०८/०९/२०२४ रोजी (दीड दिवसाचे), दि. ११/०९/२०२४ रोजी (पाच दिवसाचे), दि. १२/०९/२०२४ (गौरी व गणपती), दि. १३/०९/२०२४ रोजी (सात दिवसाचे), दि. १४/०९/२०२४ (सार्वजनिक गणेशोत्सव मेळा संघ व एकादशी विसर्जन) व दि. १७/०९/२०२४ रोजी (अनंत चतुर्थी) या कालावधीत दुपारी ११.०० वा. ते गणपती विसर्जन मिरवणूक कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मूर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका

**प्रत कार्यवाहीसाठी :—**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे/भिवंडी/कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—३, कल्याण, परिमंडळ—४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :— सपोआ कल्याण, उल्हासनगर वाहतूक विभाग, पोनि, कल्याण, कोळसेवाडी, उल्हासनगर, विठ्ठलवाडी वाहतूक उपविभाग
२/— म.न.पा.कल्याण—डोंबिवली च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner